मराठी साप्ताहिक

# युवाशक्ती एक्सप्रेस

संपादक : तुषार गायकवाड

कार्यकारी संपादिका रुबिना मुल्ला :9890879757

RNI No. MAHMAR/2016/72543

वर्ष ६वे | अंक : ०३ | रविवार,दि. २१ एप्रिल ते शनिवार २७ एप्रिल २०२४ | किंमत रू. १/- | पृष्ठ : ४

पान २ संपादकीय अधोविश्वाचा एफआयआर...

पान ३ सिलिंग कायदा...

पान ४ वसई न्यायालयात अत्यंत....

## पोमण येथील अनधिकृत बांधकामांवर २३ एप्रिल रोजी कारवाईचा मुहूर्त ?

### शासनाच्या बैठकीमध्ये एका पत्रकाराच्या उपस्थितीची चर्चा ; पत्रकाराची वसुली?

प्रतिनिधी :पालघर जिल्ह्यातील वसई तालुका अंतर्गत पोमण ग्राम पंचायत हद्दीत हजारों अनधिकृत बांधकामे झाली असून सदर अनधिकृत बांधकामांना महसूल प्रशासनाचे संरक्षण लाभले आहे. पोमण येथील मधुरा हॉटेलच्या मागे अनधिकृत बांधकामाची भिंत कोसळून मजुराचा मृत्यू झाल्यानंतर सदर ठिकाणच्या अनधिकृत बांधकामांचा प्रश्न ऐरणीवर आला असून २३ एप्रिल रोजी येथील बांधकामांवर कारवाईचा मुहूर्त तहसीलदार यांनी काढला आहे. प्रत्यक्षात कारवाई होते की मोठी तोडपाणी होते ते २३ एप्रिल रोजी कळेलच.

पालघर जिल्ह्यातील वसई तालुका अंतर्गत पोमण ग्राम पंचायत हद्दीत हजारों अनधिकृत बांधकामे झाली असून सहाजिकच महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संरक्षणाशिवाय बांधकामे होऊच शकत नाहीत. प्रती



चौरस फुटाप्रमाणे वसुली करण्यात आली असून भूमाफियांकडून करोडोची लाच जमा करून पैशांची वाटणी मंत्रालयापर्यंत करण्यात आली आहे. त्यामुळेच तर बिनधास्तपणे भूमाफिया अनधिकृत बांधकामे करीत आहेत.

पोमण येथील मधुरा हॉटेलच्या मागे एका मजुराचा मृत्यू झाल्यानंतर सामाजिक कार्यकर्ता नानासाहेब कोळेकर यांनी तिरडी आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर वसईचे तहसीलदार यांनी बैठक आयोजित केली. या बैठकीला तहसील कार्यालयातील अधिकारी, गट विकास अधिकारी, पोमण ग्राम पंचायतीचे ग्राम सेवक आदि उपस्थित होते. सर्वात महत्वाची बाब

## वसईचे लोडशेडिंग हे तात्पुरते..

### २१ एप्रिलनंतर वीजपुरवठा पूर्ववत होणार अधीक्षक अभियंता संजय खंदारे यांची माहिती..

नालासोपारा :- वसई तालुक्यात गेले काही दिवस अघोषित लोडशेडिंग सुरू असून कोणत्याही वेळी वीज जाण्याने नागरिक हैराण आहेत. त्यातच वाढलेली उष्णता, यामुळे नागरिकांना होणाऱ्या त्रासाची दखल घेऊन, भाजपा विधानसभा निवडणूक प्रमुख मनोज पाटील यांच्या सोबत प्रमुख पदाधिकारी नंदकुमार महाजन, कपिल म्हात्रे, बाळा सावंत, शेमल आजागिया यांनी महावितरणचे वसई मंडळ अधीक्षक अभियंता संजय खंदारे यांची भेट घेतली. त्यांच्या सोबत झालेल्या चर्चेत तारापुर बोईसर येथे सुरू असलेल्या महापारेषणच्या कामामुळे वसईला येणाऱ्या दोन वाहिन्यापैकी एक वाहिनी बंद असल्याने वीज पुरवठा कमी झाला असून २१ एप्रिलपर्यंत काम पूर्ण होऊन वीज पुरवठा सुरळीत होईल व सुरू असलेले भारनियमन बंद होईल असे आश्वासन दिले.




## जीव वाचवणारे अग्निशमन अधिकारी बनले जीव घेणारे यांना पाठिंबा कोणाचा? – श्लोक पेंढारी

वसई प्रभाग समिती एच मध्ये पेपरिका नावाचे हॉटेल स्टेला या ठिकाणी उघडले असून लोकांची या हॉटेलला गर्दी बघायला भेटत आहे परंतु समाजसेवक श्लोक पेंढारी यांनी या हॉटेलची चौकशी केल्यावर असे निर्देशनास आले की या हॉटेलला अग्निशमन यंत्रणेची कोणतीही परवानगी दिली गेलेली नाही गेले सहा महिन्यापासून हे हॉटेल विना परवानगीने चालू आहे व हे सगळं तेथील सहाय्यक अग्निशमन अधिकारी नंदकुमार शिंगरे यांच्याशी बोलणं केल्यावर समजले परंतु या अशा कित्येक हॉटेललांना अग्निशमन यंत्रणेची परवानगी नसते व हे अग्निशमन अधिकारी कुठेतरी आपली पोळी भाजायच्या विषयात गुंतलेले असतात गेल्या काही महिन्यात पहिले माणिकपूर पेट्रोल पंप च्या मागे गोडाऊनला लागलेली आग व त्याला नसलेली अग्निशमन यंत्रणेची परवानगी ही कुठेतरी जनतेची जीव घेण्याची




सोय केलेली आहे असे समाजसेवक श्लोक पेंढारी यांनी म्हटले आहे तसेच त्यांनी मुख्य अग्निशमन अधिकारी दिलीप पालव यांच्याशी जेव्हा चौकशीची मागणी केली तेव्हा त्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष करून चौकशी करण्यासाठी टाळाटाळ करत आहे असे सुद्धा समाजसेवक यांनी म्हटले आहे व या हॉटेलला तब्बल १५ दिवसाची परवानगी असलेल्या चे कागदपत्राची नोटीस ही अग्निशमन

# संपादकीय...!

## अधोविश्वाचा एफआयआर

काही दशकांपूर्वी मुंबईत अंडरवर्ल्डच्या कारवाया सातत्याने सुरू असत. धमकावणी, खंडणीखोरी, टोळीयुद्ध, अमली पदार्थांची तस्करी, परदेशी वस्तूंची तस्करी ही या अधोविश्वाची उघड चिन्हे होती. पुढे या कारवाया निदान वरकरणी तरी कमी होत गेल्या. मात्र अभिनेता सलमान खान याच्या घरावर झालेल्या गोळीबारानंतर अंडरवर्ल्ड पुन्हा चर्चेत आले आहे. मुंबई-महाराष्ट्राशी तसा थेट संबंध नसलेल्या बिश्नोई टोळीचे धागेदोरे या प्रकरणात गुंतलेले आहेत. वास्तविक पाहता, सध्या सायबर गुन्हेगारी प्रचंड फोफावली आहे; तरीही रक्तपात आणि धाकदपटशावर विश्वास ठेवणारी संघटित गुन्हेगारी अजूनही सुरूच आहे, याचा दाखला या घटनेतून मिळतो. या अधोविश्वाचा हा एफआयआर...

इंग्रजांनी विकसित केलेल्या मुंबई बंदरावर स्वातंत्र्यानंतर गुन्हेगारांची वक्रदृष्टी पडली. मुंबईतील या अधोविश्वावर आपला जबर जम बसवणारा हाजी मस्तान हा पहिला डॉन. त्यानंतर करीम लाला आणि वरदाराजन मुदलीयार यांनी मुंबईत पाऊल टाकत याच अधोविश्वाची वाट धरली. सोने, महागडी घड्याळे, दारू, अमली पदार्थ, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू आदींच्या तस्करीतून त्यांनी मुंबईत आपले साम्राज्य प्रस्थापित केले. सन १९६०-७०च्या दशकात हे तिघेही मुंबईच्या अंडरवर्ल्डवर राज्य करत होते. त्यांनी मुंबईचे तीन भाग केले होते. एकमेकांच्या कामात आणि हद्दीमध्ये घुसखोरी किंवा हस्तक्षेप करायचा नाही, असा या तिघांचा अलिखित करारच होता. हे सुरू असताना मुंबईकरांना अंडरवर्ल्ड फारसे परिचित नव्हते. पण या अधोविश्वात दाऊदने पाऊल टाकले आणि मग टोळीयुद्ध, रक्तपात, हत्या, हाणामाऱ्या सुरू झाल्या. 'भाई'ची दादागिरी आणि दहशत मुंबईत जाणवू लागली. दाऊदसोबतच रमा नाईक, बडा राजन, छोटा राजन, अरुण गवळी, अश्विन नाईक यांच्यासह अनेकांनी मुंबईच्या वेगवेगळ्या भागांत आपल्या नावाची जरब निर्माण केली.दाऊदला मुंबईच्या अंडरवर्ल्डवर एकहाती अधिराज्य गाजवायचे होते. त्यामुळे त्याने या क्षेत्रात आधीच पाय रोवलेल्या पठाण टोळीशी पंगा घेतला. वर्चस्व आणि अस्तित्वाच्या लढाईतून एकमेकांच्या गुंडाना मारण्याचे सत्र सुरू झाले. मुंबईत भररस्त्यात खून पडू लागले. स्थानिक गुंडांची साथ मिळाल्याने रक्तपाताच्या या लढाईत दाऊद सरस ठरत गेला. छोटा राजनसारखे अनेक गुंड त्यावेळी दाऊदसोबतच होते. १९८०च्या दशकात दाऊदने अंडरवर्ल्डमधील जवळपास सर्वच बेकायदा धंदे आपल्या ताब्यात घेतले. हे धंदे, बॉलिवूडमधील खंडणी वसुली, त्यांच्या हत्येच्या सुपाऱ्या, मुंबईभर टोळीचा पसारा यामुळे दाऊदची प्रचंड दहशत निर्माण झाली.मुंबईत दाऊद, छोटा राजन, अमर नाईक, अरुण गवळी या वेगवेगळ्या टोळयांची प्रचंड दहशत होती. दिवसाढवळ्या व्यापाऱ्यांना धमकाविणे, खुलेआम शूटआऊट अशा घटनांनी मुंबई काही वर्षे धुमसत होती. अंडरवर्ल्डची ही दहशत मोडून काढण्यासाठी तत्कालीन राज्य सरकारने एन्काऊंटरचे अस्त्र उचलले. त्यासाठी पोलिसांना मुक्तहस्त देण्यात आला. मुंबई पोलिसांनी गुंडांच्या मुसक्या आवळण्यास सुरुवात केली. त्यातूनच १९८०-९०च्या दशकात मुंबईचे तत्कालीन पोलिस आयुक्त रॉनी मेंडोंसा, सहपोलिस आयुक्त डी. शिवानंदन यांनी गुन्हे शाखेची मजबूत बांधणी केली. त्यावेळी गुन्हे शाखेत असलेले विजय साळसकर, प्रदीप शर्मा, प्रफुल्ल भोसले, दया नायक, रविंद्रनाथ आंग्रे, सचिन वाझे या एन्काऊंटर स्पेशालिस्ट अधिकाऱ्यांनी अल्पावधीतच अंडरवर्ल्डचे कंबरडे अक्षरशः मोडून काढले. मात्र हे सर्व चकमकफेम अधिकारी कोणत्या ना कोणत्या वादात सापडले. अमाप संपत्ती निर्माण करणे, बनावट चकमकी व आरोपींचे कोठडीतील मृत्यू, ॲण्टिलियासारखी बनावट प्रकरणे, राजकीय लागेबांधे असे आरोप-प्रत्यारोप व घटनांच्या गर्तेत ते सापडले. त्यामुळे, संघटित गुन्हेगारीने वर्दीतील गुंडगिरीला जन्म दिला का, असा गंभीर प्रश्न उपस्थित झाला.मुंबईमध्ये ८०-९०च्या दशकात गुन्हेगारी टोळयांनी अक्षरशः धुडगूस घातला होता. त्यावेळी १८८३-८४मध्ये प्रशिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या तुकडीतील अधिकाऱ्यांनी या गुंडांच्या नांग्या ठेचल्या. प्रदीप शर्मा, विजय साळसकर, प्रफुल्ल भोसले, रवींद्रनाथ आंग्रे, अरुण बोरुडे, विनायक सावदे, असूम मोमीन, राजू पिल्ले, संजय कदम असे अधिकारी या तुकडीत होते. सर्वात जास्त गुंडांच्या चकमकी या बॅचमधील अधिकाऱ्यांच्या नावावर असल्यामुळेच यातील बहुतांश अधिकाऱ्यांच्या नावाशी एन्काऊंटर स्पेशालिस्ट असे विशेषण जोडले गेले. अंडरवर्ल्डच्या कारवाया? गुन्हेगारी टोळयांमधील वैर, प्रत्येकाची गुन्हेगारी पार्श्वभूमी याबाबतची तपशीलवार माहिती या अधिकाऱ्यांकडे होती. त्यांची स्वतःची यंत्रणा अगदी तगडी असल्याने प्रत्येक अधिकाऱ्यांना हे पोलिस आपल्यासोबत हवे असत. माजी आयपीएस अधिकारी सत्यपाल सिंह, राकेश मारिया तसेच परमबीर सिंग या अधिकाऱ्यांनी या पोलिसांना सोबत घेऊन स्वतःची पथके तयार केली होती.या एन्काऊंटर स्पेशालिस्ट अधिकाऱ्यांची धास्ती गुंडांनी घेतली. त्यामुळेच दाऊद, छोटा राजनसारख्या इतर अनेकांनी विदेशात पळ काढला आणि तेथूनच ते आपल्या टोळयांची सूत्रे हलवू लागले. रवी पुजारी, सुरेश पुजारी, प्रसाद पुजारी यांनी विदेशातूनच धमकीअस्त्र हाती घेतले होते. सलमान गोळीबार प्रकरणातील लॉरेन्स बिश्नोईचा भाऊ अनमोल हा देखील विदेशातूनच टोळी चालवत असल्याचे बोलले जाते. सलमानच्या घरावरील गोळीबारानंतर अनमोलने फेसबुक पोस्ट लिहून गोळीबाराची जबाबदारी घेतली. त्याच्या फेसबुक पोस्टचा आयपी ॲड्रेस हा कॅनडामधील असल्याचे उघड झाले.अंडरवर्ल्डच्या सुरुवातीला हाजी मस्तान, करीम लाला आणि वरदाराजन यांनी गिरवलेला कित्ताच सध्याचे टोळीप्रमुख गिरवत आहेत. आपसांत लढून नुकसानच अधिक होत असल्याने सर्वांनी आपल्या हस्तकांमार्फत वेगवेगळ्या क्षेत्रांत - विशेषतः बांधकाम क्षेत्रात - हातपाय पसरले आहेत. त्यांनी आपली कार्यपद्धती बदलली आहे. व्यावसायिकांना धमकाविणे, त्यांच्याकडून खंडणीवसुली, अन्य बांधकामात भागिदारी, त्यासाठी स्वतःच्या ऑपरेटरचा वापर, थेट शूटआऊट न करता परदेशातून धमकीचे फोन, धमकाविण्यासाठी इंटरनेट फोन किंवा ऑडिओ क्लिपचा वापर आदी कार्यपद्धतींचा अवलंब ते करीत आहेत. केबल व्यवसाय, अमली पदार्थ तस्करी, मटका जुगार, सट्टा यात त्यांचा सहभाग आहे. मालाचा चढउतार करणाऱ्या कामगारांच्या काही संघटनांमध्ये विविध टोळयांचा वरचष्मा आहे. झटपट लॉटरी आणि

## पोमण येथील अनधिकृत...पान नं.१ वरुन

म्हणजे या बैठकीला एक पत्रकार ही उपस्थित होता. शासकीय बैठकीमध्ये पत्रकाराची उपस्थिती कशी काय असू शकते? तहसीलदार यांनी या पत्रकाराला शासकीय बैठकीत उपस्थित राहण्याची परवानगी कशी काय दिली ? हा पत्रकार पोमण येथील अनधिकृत बांधकामांची दलाली करीत असल्याचे बोलले जाते. तहसीलदार व भूमाफिया यांच्यातील दुवा म्हणून हा पत्रकार काम करीत आहे पत्रकारांनी अवैध धंद्यांविरुद्ध आवाज उठवून त्या धंद्यांवर कारवाई होईपर्यंत सातत्याने पाठपुरावा केला पाहिजे. मात्र या ठिकाणी पत्रकार दलाली करताना दिसतात.

पोमण येथील अनधिकृत बांधकामांवर २३ एप्रिल रोजी कारवाईचा मुहूर्त तहसीलदार यांनी काढला असून कारवाई होते की तोडपाणी होते ते पहायचे आहे!

## जीव वाचवणारे अग्निशमन ...पान नं.१ वरुन

यंत्रणेने बजावली आहे परंतु गेले दहा दिवस पासून कोणतेही कागदपत्र सादर केले गेले नाही व यामागे नंदकुमार शिंगरे यांचा या विना अग्निशमन परवानगी घेतलेल्या हॉटेल,लॉज, कंपन्या, व गोडाऊन यासारख्यांमध्ये हात आहे असे त्यांनी सांगितले आहे व श्लोक पेंढारी यांनी या सर्व गोष्टींची पूर्तता करण्याची जबाबदारी उपायुक्त सदानंद पुरव यांच्याकडे मांडली आहे सदानंद पुरव यांनी दोन दिवसात सहाय्यक अग्निशमन अधिकाऱ्यांकडून चौकशी अहवाल सादर करावा असे सांगितले आहे व समाजसेवक श्लोक पेंढारी यांनी जनतेला सुद्धा आव्हान केले आहे की आपण ज्या हॉटेलमध्ये जेवणासाठी जात असाल तर ते कितपत योग्य आहे याची अगोदर पडताळणी करावी व अग्निशमन यंत्रणेला सुद्धा समाजसेवक यांनी खडसावून सांगितले आहे. सात दिवसात कोणतीही कारवाई केली नाही तर एक वेगळे पाऊल उचलून अनोखे पद्धतीत आंदोलन करण्यात येईल यात कोणताही कायदा किंवा सुव्यवस्था बिघडल्यास याला सर्वस्व अग्निशमन यंत्रणेचे मुख्य अग्निशमन अधिकारी व सहाय्यक अग्निशमन अधिकारी व उपायुक्त सदानंद पुरव हे जबाबदार असतील

## शाहू महाराज आणि डॉ. आंबेडकर..पान नं.३ वरुन

अस्पृश्यता निर्मूलन, महार वतन खालसा, स्त्री संरक्षण कायदे यांसारख्या सुधारणा; तसेच कायदे करून सामाजिक क्रांती घडवून आणली. या सर्व सुधारणांना डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेमध्ये स्थान देऊन, राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक विचारांना राष्ट्रीय पातळीवर नेऊन ठेवले.

## सिलिंग कायदा...पान नं.३ वरुन

कारवाई अधिनियम २०१८ अंमलात येण्यापूर्वी सुरू करण्यात आली असेल, तर अशी कारवाई रद्द करण्यात येईल.सिलिंग कायद्यात लवकरच आणखी सुधारणा होणार?राज्यातील महसूली कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात फेरबदल/ नवीन कार्यालय निर्मिती करणं आणि महत्त्वाच्या महसूला कायद्यांमध्ये आवश्यकतेनुसार बदलांबाबत शिफारशी करण्याकरिता राज्य सरकारनं सेवानिवृत्त भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांची समिती गठीत केली आहे.यातला एक कायदा हा, महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ हा आहे.२५ ऑक्टोबर २०२३ रोजी अभ्यास समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीला समिती स्थापन केल्यानंतर ९० दिवसांत शासनाकडे अहवाल देण्यास सांगितलं आहे.सध्या या समितीचं 'कामकाज चालू आहे'.आता ही समिती सिलिंग कायद्यात बदल करण्याबाबत शासनाकडे शिफारस करते का, करणार असेल तर नेमके कोणते बदल त्यात असतील, हे समितीची अहवाल शासनाला प्राप्त झाल्यानंतरच कळेल.

## शहरात फिटनेस नसलेले अनेक टँकर रस्त्यावर !

नालासोपारा :- शहरात जिथे जलवाहिन्या नाहीत, जिथे पाणी पुरवठा व्यवस्थित होत नाही त्या भागातील नागरिकांची तहान अनेक टँकरद्वारे भागविण्यात येते. पण वसईत तहान भागविणाऱ्या काही टँकरला आरटीओचे फिटनेस प्रमाणपत्र नसून ते बिनधास्तपणे रस्त्यावर धावत असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. मनपा प्रशासनासह आरटीओचे या गंभीर विषयाकडे डोळेझाक करीत असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.शहरात सर्रास भंगार व विनाक्रमांक धोकादायक टँकरच्या माध्यमातून वाहतूक सुरू आहे. राजरोसपणे सुरू असलेल्या या टँकरच्या निमित्ताने फिटसनेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शहरात सध्या एक ते दोन दिवसांआड कमी दाबाने पाणी येत आहे. सध्या भीषण उन्हाळा जाणवत असल्याने पाणीटंचाईच्या झळा सुरू झाल्या आहेत. अनेक वसाहतींना नळयोजनाच नसल्याने त्यांना पाण्याच्या टँकरवर तहान भागवावी लागत आहे. पाण्याची मागणी वाढल्याने, सध्या शहरात टँकरचा व्यवसाय जोरात सुरु आहे. शहरातील रस्त्यावर राजरोसपणे जुनाट झालेले भंगार टँकर, विनाक्रमांकाचे टँकर रस्त्यावर चालवले जात आहेत. याशिवाय टँकरला जोडलेल्या विनाक्रमांकाचे टँकरही बिनदिक्कतपणे सुरू आहेत. वळण घेताना हे चालक अचानकपणे वेगात वळण घेतात, त्यामुळे अन्य वाहनांना आणि पादचाऱ्यांना धोका निर्माण करीत असल्याचे चित्र आहे. टँकरला क्रमांक, रिफ्लेक्टर, ब्रेक लॅम्प, स्टॉपगार्ड बसवणे आवश्यक आहे. मात्र यातील एकाही बाबीची पूर्तता केली जात नसल्याचे दिसून येत आहे.वसई विरारमध्ये अनेक भागात हजारो अनधिकृत पाण्याचे टँकर बिनधास्तपणे सुरु आहेत. गेल्या पाच वर्षांत या टँकरने चिरडून रस्ते अपघातात शेकडो जणांचा बळी घेतला असून शेकडो जखमी झाले आहेत. वसई विरार परिसरातील पाण्याची टंचाई पाहता बहुतांश रहिवासी व सोसायट्यांना या अनधिकृत टँकरने पाणीपुरवठा केला जातो. या टँकरचालकांमध्ये स्पर्धा सुरु आहे. काही टँकर चालक दारूच्या नशेत असतात. ते चालक टँकरची गती वाढवून अधिक कमाईच्या शोधात अनेक लोकांना चिरडतात. येत्या काही दिवसांत टँकरच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू, रस्ता ओलांडताना महिला व बालकाचा मृत्यू अश्या अनेक अपघातांना हे अनधिकृत टँकर चालक जबाबदार आहेत. मरण पावलेल्या व्यक्तीमूळे संपूर्ण कुटुंब उद्धवस्त झाले आहे, तर बरेच जण जखमी झाले आहेत

काय आहे नियम

पाणी वाहतुकीचे टँकर हे आरटीओ कार्यालयाकडून तपासणी करून घेणे आवश्यक आहे. अशा वाहनाची आरटीओ निरीक्षक तपासणी करून वाहन योग्य असल्याची खात्री झाल्यानंतर त्याला फिटनेस प्रमाणपत्र देतात. फिटनेस प्रमाणपत्र असल्याशिवाय वाहन चालवता येत नाही. अशा वाहनांना प्रत्येक वर्षी फिटनेस प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.

१) १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च या कालावधीत २८९ टँकरची तपासणी केली आहे. यात ६५ दोषी टँकर सापडले असून ७ लाख २३ हजार ५०० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. – **प्रवीण बागडे (सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, विरार)**

# शाहू महाराज आणि डॉ. आंबेडकर -प्रा. कीर्ती करंजावणे



फुले, शाहू, आंबेडकर या त्रयींच्या विचारांचा अभ्यास केल्याशिवाय आधुनिक महाराष्ट्र समजू शकणार नाही. महात्मा फुले यांनी महाराष्ट्रात सामाजिक क्रांतीची चळवळ सुरू केली आणि शाहू महाराजांनी ती जन्मभर अखंडपणे चालविली. डॉ. आंबेडकरांनी तिला राष्ट्रीय पातळीवर पोहोचविले. माणूस म्हणून जगण्याचा हक्क नाकारलेल्या अस्पृश्य समाजाला हक्क मिळवून देणे, ज्ञानाची कवाडे त्यांच्यासाठी खुली करणे, अस्पृश्यता निवारण करणे ही या त्रयींच्या कार्यामध्ये असलेली समानता होती.अस्पृश्य समाजाचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात अनेक कायदे केले, जाहीरनामे काढले आणि अमलात आणले. शाहू महाराजांना नेहमी वाटे, की अस्पृश्य समाजाने स्वावलंबी होऊन, आपल्या जातीचे पुढारी निवडून, त्यांच्या नेतृत्वाखाली प्रगती करायला हवी. अशातच भीमराव आंबेडकर नावाचा तरुण मुलगा परदेशात जाऊन, इतक्या उच्च पदव्या प्राप्त करून आला, ही बातमी समजतात महाराजांना विलक्षण आनंद झाला. बाबासाहेबांना भेटण्याची उत्सुकता निर्माण झाली. आंबेडकरांचा पत्ता मिळताच, हा कोल्हापूर संस्थानाचा राजा कोणत्याही मानापमानाचा विचार न करता, त्यांची भेट घेण्यासाठी मुंबईमधील परळ चाळीमध्ये गेला. शाहू महाराजांनी आंबेडकरांना मिठी मारली आणि म्हणाले, 'आता माझी काळजी दूर झाली अस्पृश्यांना पुढारी मिळाला.'अस्पृश्य समाजातील काही लोक सुशिक्षित होते; पण समाजाचे नेतृत्व करण्याचे साहस त्यांच्यामध्ये नव्हते. आंबेडकरांमध्ये असलेले नेतृत्व करण्याचे गुण शाहू महाराजांनी ओळखले होते. माणगाव परिषदेच्या निमित्ताने आंबेडकर कोल्हापुरात आले, तेव्हा शाहूंनी त्यांचे प्रेमाने आदरातिथ्य केले आणि निरोप देताना कोल्हापुरी फेट्याचा आहेर केला होता. या वेळी आंबेडकर म्हणाले होते, 'छत्रपतींनी जो मानाचा पटका माझ्या मस्तकी चढवला आहे, त्याचा मी सदैव मान राखीन.' आंबेडकरांनी जन्मभर दलितोद्धाराचे कार्य करून शाहू महाराजांच्या पटक्याचा मान राखला, याला इतिहास साक्षी आहे.अखिल भारतीय बहिष्कृत समाज परिषदेच्या निमित्ताने ३० मे १९२० रोजी पुन्हा या उभयतांची भेट झाली आणि त्यांच्यामधील स्नेहाचे संबंध अधिकच दृढ झाले. या परिषदेमध्ये येऊ घातलेल्या राजकीय सुधारणा आणि त्यानुसार अस्पृश्यांना कायदेमंडळामध्ये मिळणारे प्रतिनिधित्व या अत्यंत ज्वलंत प्रश्नावर चर्चा करण्यात आली. अर्थात, ही परिषद आंबेडकरांनीच महाराजांच्या अध्यक्षतेखाली अस्पृश्य समाजाची भूमिका सरकारला स्पष्ट करण्यासाठी आयोजित केली होती. अस्पृश्यता निर्मूलनाचे कार्य अधिक जोमाने चालावे, यासाठी निधी गोळा करण्याचा उपक्रम राबविण्यात यावा आणि त्यासाठी स्थापल्या जाणाऱ्या समितीत शाहू महाराजांचे नाव असावे, असा मनोदय आंबेडकरांनी व्यक्त करताच, शाहू महाराजांनी लगेच उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. २६ जून हा शाहू महाराजांचा जन्मदिवस. हा दिवस अस्पृश्य समाजाने सणाप्रमाणे सर्वत्र साजरा करावा, असा ठराव माणगाव परिषदेमध्ये आंबेडकरांच्या प्रेरणेने करण्यात आला. नागपूर परिषदेमध्येही त्याच स्वरूपाचा ठराव करण्यात आला.बाबासाहेब आंबेडकर अपूर्ण राहिलेले शिक्षण पूर्ण करण्यासाठी १९२०मध्ये लंडनला गेले, तेव्हा त्यांच्या उच्च शिक्षणासाठी शाहू महाराजांनी आर्थिक मदत केली. रमाबाईंना आपली लहान भगिनी मानून माहेरपणासाठी नेण्याची तयारीदेखील दाखवली होती. यावरून या दोघांमध्ये असलेले प्रेमाचे, जिव्हाळ्याचे नाते लक्षात येईल. शाहू महाराजांच्या सामाजिक कार्याचे अचूक मूल्यमापन आंबेडकरांनी 'भारतातील सामाजिक लोकशाही चळवळीचे आधारस्तंभ' म्हणून केले, तर शाहू महाराजांना आंबेडकरांचे उज्ज्वल भविष्य दिसले. बाबासाहेब हे भविष्यात हिंदुस्थानातील मागासवर्गीय समाजाचे नेते होणार, हे शाहूंनी जाणले होते, म्हणून त्यांनी एका पत्रामध्ये आंबेडकरांना 'लोकमान्य आंबेडकर' असे म्हटले आहे. यात विशेष बाब ही आहे, की 'लोकमान्य' ही पदवी त्या वेळी फक्त बाळ गंगाधर टिळकांसाठी वापरली जात असे. शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर, १९२७मध्ये 'बहिष्कृत भारत'मधील अग्रलेखात शाहू महाराजांसारखा मित्र अस्पृश्यांना पूर्वी कधीही मिळाला नव्हता, असे आंबेडकरांनी म्हटले. शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात वेठबिगार निर्मूलन, हजेरी प्रथा बंदी,

## महाराष्ट्रात तुमच्या नावावर जास्तीत जास्त किती जमीन असू शकते? सिलिंग कायदा काय सांगतो?

# सिलिंग कायदा काय आहे?

महाराष्ट्रात शेतजमिनीची कमाल मर्यादा ठरवून देणं, या मर्यादेपेक्षा अधिक जमीन एखाद्याकडे असेल तर ती संपादित करून भूमिहीन व इतर व्यक्तींना वाटप करणं, यासाठी राज्यात महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ हा कायदा अस्तित्वात आला.

यालाच सिलिंग कायदा असं म्हटलं जातं. या कायद्याअंतर्गत मिळालेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-२ या भूधारणा पद्धतीत मोडतात.

म्हणजे सरकारच्या परवानगीशिवाय या जमिनींचं हस्तांतरण होत नाही.भोगवटादार वर्ग-२ च्या जमिनींची माहिती गाव नमुना एक (क) आणि गाव नमुना ३ मध्ये नोंदवली जाते.

यात गाव नमुना एक-क (५) मध्ये, महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ अंतर्गत वाटप केलेल्या जमिनींचा समावेश होतो.

जास्तीत जास्त किती जमीन नावावर असू शकते?
सिलिंग कायद्यान्वये, एखादया व्यक्तीच्या नावावर किती जमीन असू शकते याची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

त्यानुसार,बारमाही पाणीपुरवठा किंवा बागायत जमिनीसाठी १८ एकर एवढं कमाल धारणा क्षेत्र निश्चित करण्यात आलंय.
बारमाही पाणीपुरवठा नसलेली पण वर्षातून एका पिकासाठी खात्रीचा पाणीपुरवठा असलेल्या जमिनीसाठी २७ एकर एवढं कमाल धारणा क्षेत्र निश्चित करण्यात आलंय.
हंगामी बागायत किंवा भातशेतीची जमीन असेल, तर त्यासाठी ३६ एकर ही जमीन धारणेची मर्यादा आहे.
कोरडवाहू जमिनीसाठी जमीन धारणेची मर्यादा ५४ एकर एवढी आहे.

सिलिंग कायद्याबाबतच्या महत्त्वाच्या गोष्टी
महसूल कायदेतज्ज्ञ डॉ. संजय कुंडेटकर यांच्या एका लेखात सिलिंग कायद्याबाबतच्या महत्त्वाच्या गोष्टी अधोरेखित करण्यात आल्या आहेत.

सिलिंग कायद्यानुसार, जमिनीच्या प्रत्येक हस्तांतरणासाठी नजराणा रक्कम अदा करणं आणि जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घेणं अनिवार्य असतं.
सिलिंग कायद्यान्वये,प्रदान किंवा हस्तांतरण केलेली जमीन भूधारणा वर्ग-२ ची असेल. अशी जमीन धारणाधिकार वर्ग-१ मध्ये रुपांतरित करण्याची कायद्यात तरतूद नाही.
सिलिंग कायद्यान्वये मिळालेली जमीन एखादया औदयोगिक उपक्रमाला हवी असेल किंवा खऱ्याखुऱ्या कृषितर प्रयोजनासाठी आवश्यक असेल, तर अनार्जित प्राप्तीच्या ७५% एवढी रक्कम अदा केल्यास जिल्हाधिकारी अशा हस्तांतरणास परवानगी देऊ शकतात.
अनार्जित प्राप्तीच्या ७५% म्हणजेच चालू बाजारभाव आणि अर्जदारास मूळ ज्या भोगवटा किंमतीत जमीन मिळाली होती, ती किंमत यामधील फरकाच्या ७५%एवढी रक्कम.

सिलिंग कायद्यान्वये मिळालेली जमीन, शैक्षणिक किंवा धर्मादाय संस्थेच्या कामासाठी हवी असेल, एखादया सहकारी संस्थेस जमीन हवी असेल, आणि जर अर्जदार ६५ किंवा अधिक वयाचा असेल आणि इतर कोणत्याही आजारामुळे शेती करण्यास असमर्थ असेल, तर सिव्हिल सर्जनचे प्रमाणपत्र दिल्यास, अर्जदारानं अनार्जित प्राप्तीच्या ५० % एवढी रक्कम अदा केल्यास जिल्हाधिकारी अशा हस्तांतरणास परवानगी देऊ शकतात.
सिलिंग कायद्यातील कलम -२७ अन्वये, वाटप करण्यात आलेल्या जमिनीच्या वापरात देखील बदल करण्याची तरतूद आहे. पण जमिनीच्या वापरात बदल अनुज्ञेय असेल किंवा जमिनींचं हस्तांतरण झालं असेल तरी, त्या जमिनी भोगवटादार वर्ग-२ च्याच राहतील.
सिलिंग कायद्यात २०१८ साली सुधारणा करण्यात आली. नवीन सुधारणेनुसार,

महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, २०१८ अन्वये, १५-१२-२०१८ नंतर कोणत्याही शेतजमिनी बेकायदेशीर व्यवहार किंवा शर्तभंग या कारणासाठी जिल्हाधिकारी जप्त करू शकत नाहीत, पण केव्हा जेव्हा सदर जमिनीची खरेदी विक्री करणाऱ्याने चालू बाजारभावाच्या ५०% एवढी रक्कम शासनास अदा केल्यास अशा शर्तभंग प्रकरणी कोणतीही कारवाई सुरू करण्यात येणार नाही.

ज्या प्रकरणांमध्ये, शर्तभंगाची

# वसई न्यायालयात अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती साजरी




सोमवार दिनांक १५-०४-२०२४ रोजी वसई न्यायालयात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या संयुक्त जयंतीचा कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. वसई न्यायालयात सदर कार्यक्रमाचे हे सलग दुसरे वर्ष आहे.या कार्यक्रमासाठी वसई न्यायालयातील सर्व मा. न्यायाधीश आवर्जून हजर होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड.आनंद घरत ह्यांनी केले कार्यक्रमाच्या प्रस्तावनेत त्यांनी लोकशाही आणि संविधानाचे महत्व ह्याच्यावर भाषण केले. ॲड गिरीश दिवाणजी ह्यांनी बाबासाहेबांच्या जीवनावर भाषण करताना सांगितले की, बाबासाहेबांनी त्यांच्या विरोधकांच्याहि मानवी हक्काची पायमल्ली होणार नाही व त्यांचे लोकशाही वाचविण्यासाठी अशा वेळेस मला माझ्याच विरोधकांच्या बाजूने उभे राहावे लागेल इतके थोर विचार बाबासाहेबांचे देशाच्या लोकशाहीबद्दल आहेत. त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण वसई सत्र व जिल्हा न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश मा.श्री खोंगल साहेब ह्यांनी केले. त्यांनी त्यांच्या भाषणात संविधानातील कर्तव्ये आणि अधिकार ह्या विषयांवर सुंदर मार्गदर्शन केले .सदर कार्यक्रमाची सांगता उपस्थितांना पेढे वाटून करण्यात आली. या कार्यक्रमासाठी पक्षकार, इतर वकीलांबरोबर वसई तालुक्यातील चारही बार वकील संघटनेचे कमिटी सभासद व ॲड.पी .एन.ओझा, ॲड. एम. के. तिवारी, ॲड. दिगंबर देसाई, ॲड. दर्शना त्रिपाठी, ॲड. जॉर्ज फॉरगोस, ॲड. मनोज तिवारी,ॲड. दिनेश आदमने,ॲड. चेतन भोईर,ॲड. दर्शना फाळके हे प्रामुख्याने आवर्जून उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे नियोजन ज्येष्ठ वकील ॲड. भरत पाटील,ॲड. आनंद घरत आणि ॲड. पूनम जाधव पाटील ह्यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठीॲड अविनाश विद्वांस सर, ॲड नोवेल डाबरे सर,ॲड स्मिता घायवाट मॅडम,ॲड दीपक देसाई,ॲड राजेश गायकवाड,ॲड सबिया काझी,ॲड सूचित म्हात्रे,ॲड वर्षा भिराडे,ॲड मनीषा तायडे,ॲड वैभव पाटील, ॲड प्रल्हाद राणा, ॲड प्रमोद मिश्रा, ॲड अमित देशमुख,ॲड सदाशिव हटकर,ॲड नीलेशी खराते, ॲड वंदना पटेल ॲड सरिता यादव व इतर अनेकांचे विशेष सहकार्य लाभले.



एस. सी, एस.टी बहुजन एम्प्लॉईज वेलफेअर असोसिएशनचे सचिव विनित यादव कार्यध्यक्ष प्रमोद भालेराव यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबईयेथील कार्यलयात मा.ना.केंद्रीय मंत्री रामदासजी आठवले साहेबांची भेट घेताना छायाचित्रात दिसत आहे.

# लोकसभा २०२४ निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदान आणि श्री समीर सुभाष वर्तक यांच्या महाराष्ट्र दौरा !!!



महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष सन्माननीय नानाभाऊ पटोले साहेबांच्या आदेशानुसार महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या पर्यावरण विभागाचे प्रदेशप्रमुख श्री समीर सुभाष वर्तक यांनी जालना ( पर्यावरण विभाग प्रदेश उपाध्यक्ष श्री सुरेश गवळी व जिल्हाप्रमुख श्री सलीम काझी),

नागपूर (जिल्हाप्रमुख श्री मोनीश चांदेकर), भंडारा ( जिल्हाप्रमुख श्री राजेश पारधी), , गोंदिया ( श्री अमर राहुल ), चंद्रपूर (जिल्हाप्रमुख श्री ताज कुरेशी), आणि अकोला (पर्यावरण विभाग प्रदेश उपाध्यक्ष श्री विवेक पारसकर व जिल्हाप्रमुख ग्रामीण श्री अनंत गावडे तसेच शहर जिल्हाप्रमुख श्री रहीम खान करीम खान) या सर्व जिल्ह्यातील पर्यावरण विभागातील पदाधिकाऱ्यांना भेटून कामाचा आढावा घेतला आणि त्यांना लोकसभा निवडणुकीच्या बाबतीत कामाचे वाटपाही करण्यात आले. म्हणजेच दहा दिवसांचा दौरा करून या सर्व जिल्ह्यातील पर्यावरण विभागाच्या पदाधिकाऱ्यां तर्फे महाविकास आघाडीचे उमेदवार जिंकून येण्यासाठी प्रचारात पुढाकार घेण्यात आला.

श्री समीर वर्तक यांनी पूर्व विदर्भात सन्माननीय राहुलजी गांधी यांची प्रचार रॅली, , घरोघरी प्रचार, नुक्कड सभा आणि जाहीर सभेत भाग घेतला तसेच महाविकास आघाडीच्या उमेदवार, अनेक जेष्ठ, तसेच माजी खासदार, माजी आमदार, व मान्यवरांच्या भेटी घेऊन आपल्याला महाविकास आघाडीचे उमेदवार निवडून येण्यासाठी फार मेहनत घेतलेली आहे.

आता महाराष्ट्र दौरा आटोपून पुन्हा पालघर लोकसभेतील महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या प्रचारासाठी वसईमध्ये परतले असून लवकरच दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यातील पश्चिम व उत्तर महाराष्ट्राच्या दौऱ्यावर ते निघणार आहेत.

आज संपन्न झालेल्या पूर्व विदर्भातून नक्की महाविकास आघाडीचाच विजय होणार असे समीर वर्तक यांनी मत व्यक्त केले आहे.

या संपूर्ण दौऱ्यात वसई विरार जिल्हा काँग्रेसच्या पर्यावरण विभाग जिल्हा सरचिटणीस श्री संकेत वसईकर हे श्री समीर वर्तकांसोबत होते

# वसई गाव मध्ये भेसळयुक्त खाद्य पदार्थ विक्री जोरात – नंदकुमार महाजन

वसई (प्रतिनिधी)- दिनांक १९ एप्रिल २०२४ रोजी भारतीय जनता पार्टी चे अध्यक्ष वसई शहर मंडळचे नंदकुमार महाजन यांनी वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती आय चे सह आयुक्त आणि आरोग्य विभागाचे अधिकारी यांना वसई मध्ये वाढते भेसळ युक्त पदार्थ विरुद्ध तक्रार अर्ज करण्यात आले आहे.

वसई प्रभाग समिती आय मध्ये रेस्टोरंट, हॉटेल, फरसाण, समोसे वडा विक्री करणारे लोक स्वच्छताची काळजी न घेता वारंवार उकळलेले तेल वापरून तयार केलेले चायनीज, वडा समोसे फरसाण या खाद्य प्रदूषित साहित्याचा वापर मोठ्या प्रमाणात वापर केला जातो,या दूषित खाद्य पदार्थची विक्री केली जाते त्यामुळे नागरिकांना विविध प्रकारचे आजार घसा खवखवणे उलटी होने तसेच रेस्टोरंट आणि हॉटेल यांचे मालक प्रथमतः किचन (स्वयंपाक खोली ) वॉशरूम प्रथमतः घाण असते पाण्याची टाकी वेळोवेळी साफ करत नाही, शिळे अन्न आणि फ्रिज मधले ठेवलेले अन्न दुसऱ्यादिवशी ग्राहकांना विक्री केली जाते त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशीची मागणी भाजपा वसई शहर मंडळ अध्यक्ष नंदकुमार महाजन यांनी केली आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक म्हणून तुषार राजरत्न गायकवाड रु. नं. १०, कादरभाई चाळ, सर्वोदय वसाहत, आंबेडकर नगर, टाकीरोड, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९. ता. वसई, जि. पालघर, येथे प्रकाशित होऊन तुषार पब्लिकेशन में. बाबा आर्टस् बी.०८, मथुरा नगर, द्रोणगिरी अपार्टमेंट, टाकी रोड, साई बाबा मंदिर जवळ, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९ जि. पालघर, महाराष्ट्र येथे मुद्रित करणयात आले. मोबाईल नं. ९९६०१४४३४८
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद वसई न्यायालयाच्या कक्षेत) Email:yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.com